**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता )**

क्र.पोमसं/३/११/६/ दक्षता पथक (रिक्त पदे)/३९७/१५

**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय**

शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१.

दिनांक:-२७/०२/२०१७.

वाचा:- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) नुसार.

**आदेश**

उपरोक्त संदर्भात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न चे पोट कलम (२) नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना "अपवादात्मक प्रकरणात" या अधिनियमातील कलम-२२ न (१) (क) (ड) व (इ) मध्ये विहीत केलेले विविध सामान्य पदावधी कमी करुन (curtail), प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमूद निःशस्त्र पोलीस निरीक्षकांनी केलेल्या विनंत्या विचारात घेऊन, त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विनंतीवरुन बदल्या करण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकाचे नांव | कोठून | कोठे |
|---|---|---|---|
| १. | राजन माधवराव बेकनाळकर | वि.जा.प्र.प.स., क्र.२, कोल्हापूर | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोल्हापूर |
| २. | कारभारी गंगाराम हांडोरे | वि.जा.प्र.प.स., क्र., ३ पुणे | पो.प्र.कें., खंडाळा |
| ३. | श्रीमती दिपाली सचिन भुजबळ | वि.जा.प्र.प.स., क्र., ३ पुणे | लोहमार्ग, पुणे |
| ४. | सुनिल दादासाहेब घार्गे | वि.जा.प्र.प.स., क्र., ३ पुणे | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे |
| ५. | उद्धव ग्यानबा जाधव | वि.जा.प्र.प.स., क्र.१, नवी मुंबई | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे |
| ६. | श्रीमती वैशाली संतोष वैरागडे | वि.जा.प्र.प.स., क्र.१, नवी मुंबई | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर क्र.१ व ३. |
| ७. | अरुण निवृत्ती काटकर | वि.जा.प्र.प.स., क्र.१, नवी मुंबई | ठाणे शहर |
| ८. | शिरीष प्रभाकर सासने | वि.जा.प्र.प.स., क्र.२, रत्नागिरी | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी |
| ९. | संजय दिनकर पाटील | वि.जा.प्र.प.स., क्र.२, रत्नागिरी | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सिंधुदूर्ग |
| १०. | तानाजी रामदास भगत | वि.जा.प्र.प.स., क्र.३, मुंबई उपनगर | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई उपनगर |
| ११. | हनीफ दस्तगीर मुलाणी | वि.जा.प्र.प.स., क्र.३, मुंबई उपनगर | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई शहर |
| १२. | प्रदीप निवृत्ती उगले | वि.जा.प्र.प.स., क्र.१, नाशिक | ठाणे शहर |
| १३. | नंदराज दिनकरराव पाटील | वि.जा.प्र.प.स., क्र.१, नाशिक | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक |

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकाचे नांव | कोठून | कोठे |
|---|---|---|---|
| १४. | उमेशचंद्र शाहु पाटील | वि.जा.प्र.प.स., क्र.२, धुळे | महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |
| १५. | मधुकर शंकर बारगळ | वि.जा.प्र.प.स., क्र.२, धुळे | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जळगांव |
| १६. | राजेंद्र राधाकृष्ण लोखंडे | वि.जा.प्र.प.स., क्र.२, धुळे | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नंदुरबार |
| १७. | अविनाश मोहन गीर | वि.जा.प्र.प.स., क्र.१, औरंगाबाद | परभणी |
| १८. | शंकर उमाकांत पटवारी | वि.जा.प्र.प.स., क्र.१, औरंगाबाद | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, परभणी |
| १९. | संजय सोपान केंद्रे | वि.जा.प्र.प.स., क्र.२, लातूर | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड |
| २०. | जयसिंग जगन्नाथ पवार | वि.जा.प्र.प.स., क्र.२, लातूर | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सातारा |
| २१. | उमेश दामोदर टेकाडे | वि.जा.प्र.प.स., क्र.१, अमरावती | जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती |

२. **(अ)** उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या निःशस्त्र पोलीस निरीक्षकांना बदलीच्या घटकात हजर होण्यासाठी संबंधीत घटकप्रमुखांनी **निश्चितपणे तात्काळ कार्यमुक्त करावे**.

**(ब )** बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करण्यापुर्वी ते ज्या घटकात बदलीवर जाणार आहेत त्या घटकप्रमुखांकडे रिक्त पदांची खात्री करुनच त्यांना कार्यमुक्त करावे. तसेच, रिक्त पद उपलब्ध नसल्यास तसे ह्या कार्यालयास सत्वर कळवावे.

**(क)** तसेच, संबंधीत पोलीस निरीक्षकांना त्यांच्या बदली घटकात कार्यमुक्त करताना त्यांना अदा केलेल्या कार्यमुक्ती आदेशांत **"संबंधीत पोलीस निरीक्षकांनी त्यांना कार्यमुक्त केलेल्या दिनांकापासून नियमान्वये विहीत पदग्रहण अवधीमध्ये बदलीच्या घटकात निश्चितपणे हजर व्हावे, आणि ते विहीत मुदतीमध्ये हजर न झाल्यास त्यांच्याविरुद्ध पोलीस महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्र.२/५५/०७, दिनांक ११/०१/१९८४ व दिनांक १०/०२/१९९१ आणि क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दिनांक २३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे विनाविलंब शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात येईल,"** ही बाब स्पष्टपणे नमूद करावी. त्याचप्रमाणे, अशा (विहीत मुदतीत बदली घटकात हजर न झालेल्या) पोलीस निरीक्षकांविरुद्ध वरील परिपत्रकातील तरतुदींनुसार ज्या घटकप्रमुखांनी संबंधीत पोलीस निरीक्षकास कार्यमुक्त केले असेल त्यांनी सदरची शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी, व त्याचा अहवाल आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह ह्या कार्यालयास (लक्षवेध- कार्यासन क्र.११ मध्ये) पाठवावा.

३. आदेशांप्रमाणे बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या पोलीस निरीक्षकांची घटकप्रमुखांनी वाट पाहू नये.

४. **बदली आदेशातील संबंधीत पोलीस निरीक्षक दरम्यानच्या काळात निलंबित झाले असतील तर अशा निलंबित पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त न करता त्याबाबतचा सविस्तर अहवाल ह्या कार्यालयास सत्वर पाठवावा. तसेच, अशी कोणतीही अपवादात्मक परिस्थीती निर्माण झाली असेल तर त्याबाबतचा सविस्तर अहवाल ह्या कार्यालयास तात्काळ सादर करावा.**

५. **बदली करण्यात आलेल्या पोलीस निरीक्षकास विहीत मुदतीत कार्यमुक्त करण्याची व्यक्तीशः जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखाची राहील, याची कृपया त्यांनी नोंद घ्यावी.**

६. जर एखाद्या, प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा न्यायालयाचे बदलीच्या अनुषंगाने स्थगितीचे आदेश असतील तर त्या आदेशांप्रमाणे कार्यवाही करावी, व त्याबाबतचा अहवाल ह्या कार्यालयास **उलट-टपाली** पाठवावा.

७. **कोणत्याही घटकामध्ये निवडणुकीची प्रक्रिया सुरु असल्यास, किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटकप्रमुखांनी त्याबाबत संबंधीत निवडणूक अधिकाऱ्याशी संपर्क साधून आचारसंहितेचा भंग होणार नाही याची काळजीपूर्वक दक्षता घेऊन संबंधीत पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त करावे, व तसा अहवाल ह्या कार्यालयास विनाविलंब फॅक्स्ने पाठवावा.**

८. बदली आदेशांची काटेकोरपणे व वेळेत अंमलबजावणी करण्याबाबत पोलीस महासंचालकांच्या निर्देशांनुसार सर्व घटक प्रमुखांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

९. काही बदल्यांच्या प्रकरणांत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांन्वये बदलीचे मूळ आदेश निरस्त केले जातात. अशा कारणांमुळे काही घटकांत काही पोलीस निरीक्षक हे मंजूर संख्याबळापेक्षा अतिरीक्त ठरल्यास त्याबाबतचा अहवाल ह्या कार्यालयास तातडीने सादर करावा.

११. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई / लोहमार्ग, म.रा., मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.
पोलीस अधीक्षक, परभणी / लोहमार्ग-पुणे.
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, पो.प्र.कें., खंडाळा.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित.**

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, महाराष्ट्र राज्य, पुणे.

उप संचालक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे / कोल्हापूर / पुणे / नवी मुंबई / रत्नागिरी / मुंबई उपनगर / नाशिक / धुळे / सिंधुदूर्ग / औरंगाबाद / लातूर / नागपूर / अमरावती / मुंबई शहर / जळगांव / नंदुरबार / परभणी / नांदेड / सातारा.

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव,
गृहविभाग, महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

**(लक्षवेधः-** श्री. जि.के. पाकळे, कक्ष अधिकारी, पोल-५ ब)

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठीः-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर १ महिना प्रसिद्ध करण्यासाठी)
कार्यासन अधिकारी, का.क्र.२, ९, ११, ३६ व ४० (पोमसं कार्यालय).